
लोकमत
INSPIRING
PERSONALITI
(स्वायत्त)

**शिक्षण :** B.J., M.A., M.Phil., Ph.D.

**अनुभव :** यूजी/पीजी टीचर, गाईड,
परीक्षा विभागाचे उपनियंत्रक,
पत्रकार, अनुवादक

**संशोधन :** यूजीसीच्या तीन प्रोजेक्टवर सहायक,
८० शोधलेख प्रकाशित, ३० व्याख्याने
९० शोधनिबंधांचे वाचन

जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर यशाची एक-एक पायरी चढता आली. प्रत्येक पायरीची वेदना वेगळीच होती. पत्रकारिता, अध्यापन, संशोधन अशा क्षेत्रांत काम केल्यामुळे अनुभवविश्व प्रगल्भ होत गेले आणि त्यामुळे वैचारिक प्रगल्भता लाभल्याचा मोठा आनंद आज होत आहे.





शिक्षणातील दीप...

# प्रा. डॉ. दीपक तुपे

**सहायक प्राध्यापक, विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त).**

प्रा. डॉ. दीपक रामा तुपे यांच्या यशाचे गमक म्हणजे कठोर मेहनत आणि सातत्य. व्यक्तिमत्त्वातील या दोन गुणांच्या बळावर त्यांनी कला आणि पत्रकारितेतील पदव्या प्राप्त केल्या. शिक्षणातील सर्वोच्च पदवीसुद्धा त्यांनी संपादित केली. हे शिक्षण घेत असताना संभाव्य सरकारी नोकरभरतीतील अस्थिरतेमुळे ते कधीही डगमगले नाहीत, उलट आणखी जोमाने कामाला लागले. विविध महाविद्यालयांत तासिका तत्त्वावर अध्यापन करणे, दैनिकांमध्ये प्रतिनिधी, अनुवादक, रिसर्च प्रोजेक्टसाठी सहायक तसेच मुद्रितशोधन अशी मिळेल ती कामे करून त्यांनी शिक्षणासाठी लागणाऱ्या पैशांची तजवीज केली. याचे द्योतक म्हणजे बेरोजगारांची संख्या वाढत असतानाही निव्वळ गुणवत्तेच्या जोरावर त्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत सहायक प्राध्यापक म्हणून कायमस्वरूपी नोकरी मिळाली. सध्या ते कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयात हिंदी विषयाचे अध्यापनाचे कार्य करीत असून, परीक्षा विभागाचे उपनियंत्रक, पी. जी. टीचर, गाईड आणि विविध समित्यांची जबाबदारी उत्कृष्टरीत्या पार पाडत आहेत. प्रतिकूल परिस्थितीतून आलेल्या होतकरू मुलाची ही यशोगाथा...

दीपक तुपे यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील बिजवडी (ता. माळशिरस) गावचा. त्यांचे मूळ गाव बार्शी तालुक्यातील वांगरवाडी. १९७२ च्या भीषण दुष्काळात त्यांच्या आजोबांनी चार मुलांसह गाव सोडले आणि गाव-दर-गाव करीत ते बिजवडीत आले. येथे मजुरीचे काम करीत सर्वजण स्थायिक झाले. दीपक तेथे आई-वडील आणि भावासह राहत असत. माळीनगर येथील मंडिल मल्टिपर्पज हायस्कूलमध्ये त्यांनी बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. जनावरे सांभाळत त्यांनी अकलूज येथील शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. आई-वडिलांनी दोघा भावांना शिक्षणात काही कमी पडू दिले नाही. कारण शिक्षणाअभावी त्या दोघांनी खूप कष्ट उपसले होते. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे उच्च शिक्षणासाठी दोघांपैकी एकाला संधी मिळणार होती. लहान भाऊ दशरथने मोठा भाऊ दीपक यांना ती संधी दिली. गॅरेजवर काम करून तो महिन्याला दीपक यांना हजार रुपये पाठवत होता. याची जाणीव ठेवत ते शिवाजी विद्यापीठातून एम.ए. प्रथम आणि एम.फिल. 'ओ' श्रेणीत उत्तीर्ण झाले. टिळक विद्यापीठातून पत्रकारितेचे शिक्षण घेतले. विशेष म्हणजे शिक्षणातील सर्वोच्च विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी संपादित केली. ऐन आर्थिक जिकिरीच्या काळात गुरुवर्य प्राचार्य डॉ. प्रकाश मोकाशी आणि डॉ. संजय कांबळे (नेसरी) तसेच डॉ. माधवी जाधव, प्रो. डॉ. अर्जुन चव्हाण, डॉ. राजेंद्र शहा, प्रो. डॉ. पांडुरंग पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

पीएच.डी.नंतर 'लोकमत समाचार'च्या कोल्हापूर आवृत्तीमध्ये त्यांनी वार्ताहर म्हणून चार वर्षे काम केले. त्यानंतर पुणे आवृत्तीमध्ये अनुवादक म्हणून तीन वर्षे काम केल्याचा सार्थ अभिमान असल्याचे ते सांगतात. पुण्यात असताना सकाळी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठात सी.एच.बी.वर अध्यापन करणे, दुपारी आबासाहेब गरवारे महाविद्यालयात यूजीसीच्या प्रोजेक्टवर सहायक म्हणून काम करणे आणि संध्याकाळी 'लोकमत समाचार'मध्ये अनुवादकाचे काम करणे, अशा तिहेरी पातळीवर काम करीत असताना त्यांची त्रेधातिरपीट होत असे. रविवारी सुट्टीच्या दिवशी टायपिंग, प्रूफ रीडिंगची कामेसुद्धा ते करीत. अशा या धावपळीच्या काळात अर्धांगिनी विजया यांनी त्यांना सक्षम साथ दिली. यामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विविध विषयांवरील तीन मेजर रिसर्च प्रोजेक्टसाठी सहायक संशोधक म्हणून काम करणे त्यांना सोयीचे झाले. सध्या ते शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषद व महाराष्ट्र हिंदी परिषदेचे सदस्य आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अभ्यासक्रमातील तीन पुस्तकांच्या मुद्रितशोधनाची जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध मासिकांमधून त्यांचे तब्बल ८० शोधलेख प्रकाशित झाले आहेत. त्याबरोबर अधिवेशने, परिषदांमध्ये १० शोधलेखांचे त्यांनी वाचन केले आहे. 'हिंदी भाषा आणि सूचना प्रौद्योगिकी' या विषयावरील त्यांचे पुस्तक अभिषेक प्रकाशन (नवी दिल्ली)ने प्रकाशित केले असून, ते शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. आणखी दोन मौलिक पुस्तके तसेच एक अनुवादित व काव्यसंग्रहही प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. विविध दैनिकांमध्ये त्यांचे प्रासंगिक विषयांवरील लेखही प्रसिद्ध झाले असून, आजपर्यंत त्यांनी ३० हून अधिक व्याख्याने दिली आहेत. विविध शैक्षणिक स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणूनही ते जबाबदारी पार पाडत आहेत. यासाठी त्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन सतत लाभत आहे.

डॉ. दीपक तुपे यांची कॉलेज परिसरात अभ्यासू आणि कडक शिस्तीचे प्राध्यापक म्हणून ओळख असून संस्थेने दिलेले शैक्षणिक कार्य ते शंभर टक्के यशस्वीपूर्ण पूर्ण करतात. गरजू आणि हुशार विद्यार्थ्यांना मदत करण्यात ते कायम अग्रेसर असतात. आतापर्यंत अनेकांना त्यांनी सढळ हाताने मदत केली आहे. तसेच मित्रांमध्येही ते मितभाषी, स्पष्टवक्ते असून राज्यासह देशभरात त्यांचा मोठा मित्रपरिवार आहे.

युवकांना संदेश देताना ते म्हणतात की, शिक्षणाचा खरा उद्देश नोकरी मिळविणे नसून, व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे होय. या व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर कोणी नोकरी मिळवेल, कोणी उद्योग-व्यवसाय करील; परंतु आपल्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत समाजाच्या विकासातही जो योगदान देतो तो खरा आदर्श नागरिक होय. अशा आदर्श नागरिकास आयुष्यभर विद्यार्थी म्हणून जगता आले, तर जीवन खूप सुंदर असल्याचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही.




लोकमत
INSPIRING
PERSONALITIES
Chate


लोकमत
INSPIRING
PERSONALITIES
Featuring Amazing Success Stories Of Achievers From Kolhapur, Sangli, Satara Districts
सई खराडे
बबिता अग्रवाल
नूतनदेवी अग्रवाल
घन:श्याम आवटे
प्रसन्न आवळे
स्मिता वैद्य
नीलिमा मिठारे
विनोद चंदवानी
सोनाली चिपडे
डॉ. ॲड. गणेश चौगुले
प्रा. महेश्वरी चौगुले
प्रवीण चौगुले
सचिन चौगले
डॉ. शीतल देसाई
फिजा हिरोली-भोसले
विकास जाधव
महादेव कदम
गिरीश कर्नावट
रोहित काळाके
वैशाली कोष्टक
महेश कौशिक
चेतन कोळी
प्रा. डॉ. भाऊसाहेब कौरे
डॉ. बलवंत कुलकर्णी
वैशाली महाडिक
डॉ. महादेव नरके
संजीवनी ओसवाल
अंजुम पठाण
जास्मिन पठाण
राजश्री पाटील
सुहास पाटील
वनिता पाटील
ज्ञानाजी पवार
रेखा राजगडकर
डॉ. अजित सासिन्ते
पंचशीला साळवे
दादू सलगर
सई साळे
गजानन सावंत
चंद्रशेखर शिंदे
पतंगराव शिंदे
गणेश तुम्पद
प्रा. डॉ. दीपक तुपे
राजगोंडा वळिवडे
रवींद्र वराळे
रोहन वाघमारे
विशेष अतिथी
मा. श्री. सयाजी शिंदे
प्रसिद्ध अभिनेते
मा. श्री. सतेज डी. पाटील
माजी गृहराज्यमंत्री
दिनांक : 16 जुलै 2022 | वेळ : दुपारी 4.30 वाजता
Entry for invitees only.
www.facebook.com/lokmatevent
www.youtube.com/c/lokmatevents
Pride Partners
नवग्रह रत्न केंद्र
Chate
The Symbol of Merit
SHRUTIKA SCANS
TEJAS
K TREE

लोकमत

# प्रेरणादायी, कर्तबगार व्यक्तिमत्त्वांचा सन्मान

## ‘लोकमत इन्स्पायरिंग पर्सनॅलिटीज अवॉर्ड्स्’चे वितरण : कॉफीटेबल बुकचे शानदार प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सामाजिक, आरोग्य, उद्योग अशा नानाविध क्षेत्रांत आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटविणाऱ्या ४५ प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा ‘लोकमत’तर्फे ‘लोकमत इन्स्पायरिंग पर्सनॅलिटीज अवॉर्ड्स्’ने शनिवारी शानदार समारंभात सन्मान करण्यात आला. मराठीसह हिंदी, तेलुगू, तमिळ चित्रपटसृष्टीतील अभिनेते सयाजी शिंदे व माजी पालकमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते या अवॉर्ड्सचे वितरण करण्यात आले. कर्तबगारीचा आलेख मांडणाऱ्या कॉफीटेबल बुकचेही प्रकाशन यानिमित्त करण्यात आले.

महाराजा सुप्रीम बँक्वेट या आलिशान सभागृहात अत्यंत उत्साही वातावरणात झालेल्या या समारंभात सयाजी शिंदे यांनी या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करीत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. सर्वच क्षेत्रांत विधायकतेची बाजू मांडणाऱ्या ‘लोकमत’ने पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूरसह सांगली, साताऱ्यातील विविध क्षेत्रांतील व्यक्तिमत्त्वांच्या कर्तबगारीला साज चढविला आहे, असे मत त्यांनी नोंदविले.

माजी पालकमंत्री सतेज पाटील म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रातील मातब्बर मंडळींचा गौरव करणाऱ्या ‘लोकमत’चे खऱ्या अर्थाने समाजात ‘लोकमत’ आहे. पश्चिम महाराष्ट्राने देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. या तीन जिल्ह्यांतील रत्नांना शोधून काढून ‘लोकमत’ने त्यांना व्यासपीठावर आणले. त्यांना भविष्यकाळाचा पाट मांडण्याची संधी दिली. अनेक मंडळींचे काम लोकांपर्यंत पोहोचत नाही. मी किंवा सयाजी शिंदे असतील तर आमची टाचणी पडली तरी त्याची बातमी होते. या रत्नांचे काम सर्वांपर्यंत ‘लोकमत’च्या माध्यमातून पोहोचत आहे. सयाजी शिंदेंसारख्या माणसांना कोणताही हव्यास नाही. झाडे जगली पाहिजेत आणि ती वाढली पाहिजेत, एवढीच अपेक्षा ठेवून ते सह्याद्री देवराईच्या रूपातून काम करीत आहेत. पुढच्या तीन पिढ्या इतिहासाचे काम उलटून बघताना त्यांचाही ऊर भरून येईल. तुमच्या कामाचा गौरव स्वकर्तृत्ववान माणसांच्या हस्ते होत आहे. त्यामुळे पुरस्कार मिळाल्यानंतर जबाबदारी आणखी वाढली आहे. कामाची गती वाढली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सुरुवातीला ‘लोकमत’चे संस्थापक-संपादक स्वर्गीय जवाहरलालजी दर्डा यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यानिमित्त ‘लोकमत’चे सहायक उपाध्यक्ष मकरंद देशमुख, ‘लोकमत’ सांगली शाखेचे व्यवस्थापक विक्रम हसबनीस, उपवृत्त संपादक विश्वास पाटील, जाहिरात विभागप्रमुख विवेक चौगुले, राम जोशी, अनू एच. मोतीवाला यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. अभिनेते सयाजी शिंदे व माजी पालकमंत्री सतेज पाटील, घाटे शिक्षण समूहाचे डॉ. भारत खराटे, श्रुतिका स्कॅनचे डॉ. राजेंद्र चिंचणीकर, नवग्रह रत्न केंद्राच्या अनू एच. मोतीवाला, तेजस ग्रुपचे गणेश तुप्पद, हॉटेल वैदूर्यचे अमित गुळवणी यांचे ‘लोकमत’तर्फे सहायक उपाध्यक्ष मकरंद देशमुख यांनी स्वागत केले.




कोल्हापुरात शनिवारी लोकमत इन्स्पायरिंग अवॉर्ड्सच्या निमित्ताने ख्यातनाम अभिनेते सयाजी शिंदे व माजी पालकमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते खास कॉफीटेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डावीकडून राजेंद्र चिंचणीकर, डॉ. भारत खराटे, ‘लोकमत’चे उपवृत्त संपादक विश्वास पाटील, ‘लोकमत’चे सहायक उपाध्यक्ष मकरंद देशमुख, अनू एच. मोतीवाला, लोकमत सांगली आवृत्तीचे व्यवस्थापक विक्रम हसबनीस उपस्थित होते.

### बासरीवादनाने रंगत वाढली

महाराजा सुप्रीम बँक्वेट या आलिशान सभागृहात अत्यंत उत्साही वातावरणात प्रसिद्ध बासरीवादक सचिन जगताप यांनी भक्तिगीतांसह नव्या-जुन्या गाण्यांची धून बासरीवादनातून उपस्थितांना सादर केली. त्यांच्या संस्मरणीय वादनाने उपस्थित मंत्रमुग्ध झाले.

### टॉप टेन झाडांना सेलेब्रिटी करा : शिंदे

**१** एक झाड पिढ्यानपिढ्या ऑक्सिजन देण्याचे काम करते. त्यावर अनेक पशू, पक्षी, किडा, मुंग्यांची कुटुंबे जगतात. अशी जुनी, शेकडो वर्षांची झाडे शोधून, त्यांना टॉप टेन सेलेब्रिटींची नावे देऊन ती नावारूपास आणावीत, असे आवाहन सयाजी शिंदे यांनी केले. दहा किलो सोने घेतले तर त्यातून पैशाशिवाय काहीच फायदा नाही. मात्र, त्याच पैशातून झाडे लावली तर ती अव्याहतपणे ऑक्सिजन देतील. खरे सोने मातीत आहे. जन्मापासून मरेपर्यंत ऑक्सिजन लागतो. म्हणून प्रथम सीड बँक तयार करा, त्यानंतर रोप बँक तयार करा, झाडे लावा आणि ती जगवा.

**२** शाळेत प्रवेश घेताना बिया, रोपे द्या आणि ती दहावी, बारावीपर्यंत जगविण्याचा कायदा करा. त्यातून एक्स्ट्रा करिक्युलममधे गुण झाड जगविल्याबद्दल शाळांनी मुलांना द्यावेत, अशी सूचना शिंदे यांनी केली. सरतेशेवटी त्यांनी ‘देऊन देऊन देणार कोण; झाडाशिवाय हाय कोण?, जगून जगून जगणार कोण? झाडाशिवाय हाय कोण’ अशी टॅगलाईन ‘लोकमत’करिता सुचविण्याचे आवाहन केले. यावेळी कॉफीटेबल बुकसाठी संपादन साहाय्य करणाऱ्या प्रगती जाधव-पाटील यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### सिद्धनेर्लीत ४५ वी देवराई

सिद्धनेर्ली येथे डॉ. डी. वाय. पाटील ग्रुपच्या वतीने सह्याद्री देवराई दत्तक घेतली आहे. ही राज्यातील ४५वी देवराई ठरली. याच कार्यक्रमात त्याची घोषणा सयाजी शिंदे यांनी केली. त्यानंतर घाटे शिक्षण समूहातर्फे १००, तर डॉ. अजित राजगिरे यांनी २००, यांसह आठींनी रोपे देण्याचे व त्यांची जबाबदारी घेण्याचे मान्य केले.

**यांचा झाला सन्मान :** माजी महापौर सई खराडे, रोहन वाघमारे, रवींद्र वराळे, राजगोंडा वळिवडे, प्रा. डॉ. दीपक तुपे, गणेश तुप्पद, प्रा. चंद्रशेखर शिंदे, गजानन सावंत, सई साठे, दादू सलगर, पंचशीला साळवे, डॉ. अजित राजगिरे, रेखा राजगडकर, तानाजी पवार, वनिता पाटील, सुहास पाटील, राजश्री पाटील, आस्मीन पठाण, अंजुम दाऊद पठाण, संजीवनी ओसवाल, प्राचार्य डॉ. महादेव नरके, वैशाली महाडिक, डॉ. यशवंत कुलकर्णी, प्रा. डॉ. भाऊसाहेब कोरे, चेतन कोळी, महेश कोकीळ, वैशाली कोडक, रोहित काळाळे, गिरीश कर्नावट, महादेव कदम, विकास जाधव, पिजा हिरोली-भोसले, शीतल संजय देसाई, सचिन चौगले, प्रवीण चौगुले, प्राचार्या महेश्वरी चौगुले, डॉ. ॲड. गणेश चौगुले, सोनाली गिरिधर चिपडे, विनोद वंदवाणी, नीलिमा मिसाळे, स्मिता वैद्य, प्रसन्ना आवटे, घनशाम आवटे, नूतनदेवी अग्रवाल, बबिता अग्रवाल.